# <u>प्रेसनोट</u>

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 174/2022 दिनांक : 29.04.2022

# 1)जबरी चोरी :–

**1)भाग्यनगर :–** दिनांक 27.04.2022 रोजी चे 21.45 वा. चे सुमारास, **भारत इस्कवेअरच्या समोरील बाजुस कॅनल रोड नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा त्याचे मित्र कॅनल रोड येथे वॉकींग करत असतांना नमुद आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी व त्याचे मित्र यांना चाकुचा धाक दाखवुन जबरीने दोन मोबाईल किंमती 10,000/–रूपये अंदाजे व फिर्यादीचे खिशातील सुमारे 3200/–रू असे एकुण 13,200/–रूपयाचा माल जबरीने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी विपीन वि. कुलकर्णी, वय 42 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी रा. छत्रपती चौक नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 149/2022 कलम 392, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोनि/श्री कांबळे, मो. क्रं. 9823031227** हे करीत आहेत.

**2)मनाठा :–** दिनांक 28.04.2022 रोजी, **मौ. चाभरा ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा त्याचे शेतात हळदीचे जवळ जागली करीता झोपलेला असताना यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीचे जबरदस्तीने हातपाय बांधुन उचलुन नेवुन अपहरण करून ज्वारीचे शेतात नेवुन फिर्यादीस मारहाण करून वीस लाख रूपयांची खंडणीची मागणी केली. तसेच फिर्यादीस अटकावुन ठेवुन फिर्यादीचे खिशातील नगदी 2600/–रूपये एक एटीएम कार्ड व एक मोबाईल जबरीने चोरून नेले. व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी पुंडलीक हरीचंद्र कपाळे, वय 54 वर्षे, व्यवसाय शेती रा. चांभरा ता. अर्धापुर जि. नांदेड,** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मनाठा** गुरनं 82/2022 कलम 394, 364, 387, 342, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री चिट्टेवार, मो.क्रं. 9834634149** हे करीत आहेत.

# 2)घरफोडी :–

**1)भोकर :–**दिनांक 27.04.2022 रोजी चे 12.00 ते दि. 28.04.2022 रोजी चे 07.00 वा. चे दरम्यान, **विश्वकर्मा नगर म्हैसा रोड भोकर ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीने आपल्या घराला कुलूप लावुन हनुमान मंदीराचे कामा करीता नागपुर येथे मुला बाळासह गेला असता कोणीतरी अज्ञात आरोपीतांनी फिर्यादीचे घराचे कडी कोंडा तोडुन आत प्रवेश करून सोन्या चांदीचे दागने व नगदी 7,06,160/–रूपयाचा ऐवज चोरून नेला. वगैरे **फिर्यादी साईनाथ भीमराव दासरवाड, वय 32 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. विश्वकर्मा नगर म्हैसा रोड भोकर ता. भोकर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरनं 149/2022 कलम 454, 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री कांबळे, मो.क्र. 9096254358** हे करीत आहेत.

**2)लिंबगाव :–**दिनांक 28.04.2022 रोजी चे 02.00 वा. चे सुमारास, **फिर्यादीच्या घरी मौ. पिंपरी (मक्ता) ता. जि. नांदेड येथे,** यातील अज्ञात आरोपीतांनी फिर्यादीचे घराचे समोरील बाजुला आपेन प्लेस असुन भिंतीच्या छोटया छोटया खिडक्याचा आधार घेवुन वर चढुन घराचे मध्ये आतप्रवेश करून फिर्यादीच्या नातेवाईक राधाबाई लोकडे यांच्या कानातील झुंबर जोराने ओढुन कानाला दुःखापत करून अंगावरील सोन्याचे दागीने ओढुन घेतले व फिर्यादीच्या मुलीने दुसऱ्या रूम मधील कपाटात ठेवलेल्या पर्स मधील सोन्याचे दागीने व नगदी 2000/–रू असा एकुण 62,000/–रूपयाचा ऐवज चोरून घेवुन पळुन गेले. वगैरे **फिर्यादी भारत पि. सखाराम पोहरे, वय 55 वर्षे, व्यवसाय शेती रा. पिंपरी (म) ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लिंबगाव** गुरनं 68/2022 कलम 380, 459 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री दामोधर, मो.क्र. 9823971641** हे करीत आहेत.

# 3)चोरी :–

**मुदखेड :–**दिनांक 27.04.2022 रोजी चे 10.30 वा. चे सुमारास, **शंकरनगरच्या उतारावर रोही पिंपळगाव मुदखेड ते माळकौटा रोडवर अशोक लोभाजी शिंदे यांचे शेताजवळ ता. मुदखेड जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी व त्याचा मित्र मो सा कं एमएच–26/वाय –3402 वर मुदखेड ते वसंतवाडी जाताना लघवी करीता उतरल्याने एका मो सा वर तीघे अज्ञात इसम पाठीमागुन येवुन त्यापैकी पाठीमागे बसलेल्या इसमाने फिर्यादीचे मो सा चे समोरील कव्हर मधील रियलमी कंपणीचा मोबाईल किंमती 5000/–रूपयाचा एक मो सा किंमती 20,000/–रूपयाची असा एकुण 25,000/–रूपयाचा मुद्देमाल चोरुन नेला. वगैरे **फिर्यादी प्रकाश दत्तराव शिंदे, वय 30 वर्षे, व्यवसाय शेती रा. वसंतवाडी ता. मुदखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुदखेड** गुरनं 01/2022 कलम 379, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/2721 शिंदे, मो.क्र. 7774351375** हे करीत आहेत.

## 4)भारतीय हत्यार कायदा :–

**1)भाग्यनगर :–** दिनांक 28.04.2022 रोजी चे 13.30 वा. चे सुमारास, **जिरायत मैदान जंगमवाडी नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी त्याचे ताब्यात विनापरवाना बेकायदेशीर रित्या एक लोखंडी तलवार किंमती 600/–रूपयाची बाळगलेले मिळुन आल. वगैरे **फिर्यादी पोहकॉ/2316, संजय रामचंद्र कळके, ने. पोस्टे भाग्यनगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 150/2022 कलम 4/25 भा.ह. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोहेकॉ/2014 सिरसाट, मो.क्र. 9423306245** हे करीत आहेत.

**2)विमानतळ :–** दिनांक 28.04.2022 रोजी चे 13.40 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे राहाते घरी शिवनगर नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने त्याचे ताब्यात विनापरवाना बेकायदेशीर रित्या एक लोखंडी खंजर किंमती 1000/–रूपयाचा बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/1211, बंडु पि. केशवराव कलंदर, ने. पोस्टे विमानतळ** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 159/2022 कलम 4/25 भा.ह. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोहेकॉ/1724 पांचाळ, मो.क्र. 9423437844** हे करीत आहेत.

## 5)प्रोव्हिबीशन :–

**लिंबगाव :–** दिनांक 28.04.2022 रोजी चे 15.15 वा. चे सुमारास, **मौ. वडवणी पाटी जवळ ता. जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी /विदेशी दारु किंमती 2890/–रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/95, मुंजाजी अशोकराव चौरे, वय 32 वर्षे, ने. पोस्टे लिंबगाव** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लिंबगाव** गुरनं 69/2022 कलम 65(ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/दामोदर, मो.क्र. 8623915358** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड